स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

सामाजिकशास्त्रे विद्याशाखे अंतर्गत पीएच.डी. राज्यशास्त्र पदवीसाठी

सादर करावयाचा शोध प्रबंधाचा आराखडा

संशोध-न विषय

मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्रातील ब दर्जाच्या नगरपालिकांचे तौलनिक अध्ययन : विशेष संदर्भ बीड व अहमदनगर जिल्हा

संशोध□

प्रशांत भाऊसाहेब सोळंके

(एम.ए,बी.एड, बी.पी.एड,एम.फील.)

मा□दर्श□

प्रा.डॉ. विशाल रावसाहेब पतंगे

(पिपल्स कॉलेज नांदेड)

संशोध-न □द्र

पिपल्स कॉलेज नांदेड

वर्ष : २०१६

प्रस्तावना :

लोकशाही खऱ्या अर्थाने समाजामध्ये रूजविन्यासाठी सत्तेचे विकेंद्रीकरण होणे अवश्यक आहे आणि हे सत्तेचे विकेंद्रीकरण होण्याचे साधन म्हणजे स्थानिक स्वराज्य संस्था होय. लोकशाहीमध्ये सर्वांना सत्तेत वाटा मिळावा, सर्व लोकांचा सहभाग असावा हा उद्देश समोर ठेऊन स्थानिक स्वराज्य संस्थांची निर्मिती झाली.

लोकशाहीत सर्व सर्वसामान्यांचा सत्तेतील वाटा सत्तेत अनिवार्य समजला जातो. ज्या अनेक प्रकारांनी सर्वसामान्यांना सत्तेत सहाभाग देण्याचा प्रयत्न केला जातो त्यात स्थानिक स्वराज्य संस्थाचे स्था-न महत्वाचे आहे. लोकशाहिच्या व्यापक दृष्टीकोनातून विचार केल्यास असे आढळून येते की जर व्यक्तीच्या दृष्टीने जीवनमार्ग असेल तर स्थानिक संस्थांची व्यक्तीला मदतच होत असते. केवळ शासन प्रकारच लो□शाही तत्वावर आधारीत असून चालत नाही तर त्यासाठी लोकांचा दृष्टिकोन विचार या गोष्टीदेखील लोकशाही भूमिकांशी सुसंगत असणे आवश्यक असते. स्थानिक स्वराज्यांचा सबंध प्रामुख्याने व्यक्तीच्या दैनंदिन जीवनांशी येतो व या संस्था व्यक्तीचे दृष्टिकोन विचार इत्यादींवर परिणाम करित असतात व व्यक्तीचे व्यक्तीमत्व घडविण्याच्या प्रक्रियेत त्यांचे बहुमोल सहकार्य होत असते. समाजात आपले जीवन व्यतीत करीत असतांना निर्माण होणाऱ्या तार्ण तणावांना तोंड देण्याचे प्रशिक्षण व्यक्तीला स्थानिक संस्थांकडून मिळत असते.

भारत देशामध्ये लोकशाही शासन व्यवस्थेचे तीन प्रमुख स्तर आहेत. राष्ट्रीय स्तरावर केंद्र शासन, राज्य स्तरावर राज्य शासन व स्थानिक स्तरावर स्थनिक स्वशासन यांचा समावेश होतो. स्थानिक स्वशासनामध्ये ग्रामीण व नागरी स्थानिक स्वराज्य संस्था येतात. या संस्था स्थानिक क्षेत्रात विकासाची जबाबदारी पार पाडतात.

जन कल्यान व राज्य कारभारासाठी सुविधा या दुहेरी उद्देशा करीता स्थानीक स्वशासनाची स्थापना □ली जाते. त्यामुळे जगातील बहुतांशी राष्ट्रात या व्यवस्थेचा स्विकार केला गेला.

स्थानि□ स्वशासनाच्या उपयोगीतेमुळे विविध राष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थाच्या तुलनात्मक अभ्यास होऊन त्या त्या देशातील अशी सुपुत्र व्यवस्था नाही तेथे स्थानिक स्वशासनाचे नवे रूप आकार घेत असते.

आज स्थानिक स्वशासन संस्थांचा दर्जा घटनात्मक बनला आहे. १९९३ पूर्वी त्यंना केवल वैधानिक आधार होता. केवळ राज्य शासनाच्या कायद्यांचा आधार होता म्हणून त्या संस्था वैधनिक होत्या. आज त्यांना राज्यघटनेत स्थान दिलेले असल्यामुळे त्यांचे स्थान घटनात्मक बनले आहे.

या पूर्वी घटनेच्या कलम ४० मध्ये राज्याने या संस्था निर्माण करण्याची निती स्वीकारावी एवढाच उल्लेख होता. केंद्र आणि राज्य यांच्या अधिकारांच्या विभागणीत स्थानि□ स्वशासन हा विषय राज्य सुचित समाविष्ट केल्याचा उल्लेख राज्य घटनेच्या सातव्या परिशिष्टात आढळतो.

भारत सरकारने सन १९९३ मध्ये संमत केलेल्या ७३ व ७४ व्या घटना दुरूस्ती अधिनियमा नुसार भारतातील स्थानिक स्वराज्य संस्थाना अधिनियमानुसार ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थाना तर ७४ व्या घटना दुरूस्ती अधिनियमानुसार नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाना संवैधानिक अधिकार प्राप्त झाले.

या पूर्वी राज्य शासनाच्या इच्छे नुसार या संस्थाचे काम चालत असे. आता मात्र घटनादत्त अधिकारानुसार या संस्था कामकाज करतात.

स्थानिक स्वराज्य संस्था मध्ये मुख्यत्वे करून स्थानिक लोकांचाच सहभाग असतो. त्यांचा कारभार ि□वा प्रशासन स्थानिक लोकामार्फतच चालविले जाते. स्थानिक लोकांच्या प्रशासनातील सहाभागामुळे या संस्थांच्या कारभारात कार्य क्षमता व पारदर्शकता येण्यास मदत होते. कारण स्थानिक प्रशासनाची जाण स्थानिक लोकांनाच चांगल्या प्रकारे असते. आपल्या पुढील महत्वाचे प्रश्न कोणते आहेत आणि ते कशा प्रकारे सोडविले जातील या गोष्टी स्थानिक लोक चांगल्या प्रकारे ओळखून असतात. त्यामुळे अशा प्रश्नांबाबत तातडीने निर्नय घेणे आणि स्थानिक गरजेच्या पूर्ततेसाठी लागलीच अंमलबजावणी करणे सहज शक्य होत.

स्थानिक लोकांना ही कामे आपलीच आहेत असे वाटत असल्याने ती कामे व्यवस्थित पणे केली जातात की नाही याची दक्षता त्यांच्याकडून घेतली जाते.

या सर्व बाबीमूळे स्थानिक स्वराज्य संस्थाच कारभारात आपोआप पारदर्श करता येते.

स्थानिक स्वराज्य संस्थांचे एक ठळक वैशिष्ठ्य असे की त्यांच्या कार्यक्षेत्राला भौगोलि□ ि□वा प्रादेशिक मर्यादा पडलेल्या असतात. दुसऱ्या शब्दात सांगावयाचे तर त्याचे कार्य क्षेत्र अगदी लहानशा प्रादेशिक विभागा पुरते मर्यादित असते.

भारतातील स्थानिक स्वराज्य संस्थांचा विचार केला तर त्यांचे कार्यक्षेत्र गांव, शहर किंवा फार तर जिल्हा एवढ्या पुरते सिमीत असते. त्याच्याकडे प्रामुख्याने स्थानिक स्वरूपाची म्हणजेच स्थानिक प्रश्नाशी निगडीत असलेली कामे सोपविलेली असतात. म्हणून त्यांना स्थानिक स्वराज्य संस्था असे म्हटले जाते.

स्थानिक स्वराज्य संस्थांना मर्यादित प्रमाणावर स्वायत्तता असते. म्हणजे आपला कारभार चालविण्यासाठी आवश्यक असलेले स्वात य त्यांना आलेले असते.

सरकारच्या कायद्याद्वारे स्थानिक स्वराज्य संस्थांची निर्मिती झालेली असते. या कायद्यातच त्यांच्या अधिकारा संबंधी तरतूदी करण्यात आलेल्या असतात.

परंतु स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विकासाच्या बाबतीत मात्र असमतोल दिसून येतो.

महाराष्ट्रामध्ये सुध्दा नगरपालीकांच्या विकासाच्या बाबतीत असमतोल दिसून येतो. पश्चिम महाराष्ट्रातील नगरपालीका आणि मराठवाड्यातील नगरपालीका यांच्यामध्ये विकासाचा असमतोल दिसून येतो.

स्थानिक स्वराज्य संस्थेची निर्मीती ज्या उद्देशाने झाली तो उद्देश आज किती ठिकाणी पुर्ण होतोय हा □रोखरच वैचारीकतेचा मुद्दा आहे. म्हणून नगरपालीकांच्या विकासाचा होणारा हा असमतोल नेमका □ाणत्या कारणामुळे होतो, पश्चिम महाराष्ट्रात नेमके असे काय आहे जे मराठवाड्यामध्ये नाही, पश्चिम महाराष्ट्रातील नगरपालीकांची आर्थिक स्थिती कशामुळे प्रबळ आहे, मराठवाड्यामध्ये ही स्थिती का नाही, इत्यादी प्रश्नांचा ऊहापोह करण्यासाठी सदरील संशोधन कर्य करायचे आहे.

पश्चिम महाराष्ट्रातील राजकीय भौगोलिक परिस्थीतीतचा परिणाम तेथिल स्थानिक स्वराज्य संस्थाच्या विकासावर झालेला दिसून येतो. मराठवाड्यामये मात्र पूर्णपणे या उलट परिस्थिती पाहायला मिळते. मराठवाड्यातील राजकीय परिस्थिती ही विकासच्या बाबतीत उदासीन असल्याचे दिसून येते. भौगोलिक परिस्थीतीचा विचार केला तर मराठवाडा हा नेहमीच दुष्काळाच्या छायेत राहिलेला व सुपीक भूभाग नसलेला दिसून येतो.

पश्चिम महाराष्ट्रातील नगरपलिकांची राजकीय, सामाजिक आर्थिक परिस्थिती जानून घेण्यासाठी व मराठवाड्यातील नगरपालिकांची राजकीय, आर्थिक, राजकीय परिस्थितीत आवश्यक त्या सुधारणा □रण्यासाठी काही गोष्टींचा अवलंब करावा लागेल.

समस्यसासुत्र□ :

महाराष्ट्रातील नगरपालीकांच्या विकासाचा प्रादेशिक असमतोल दिसून येतो पश्चिम महाराष्ट्रातील न□रपाली□ा ह्या मराठवाड्यातील नगरपालीकांपेक्षा निश्चितच विकासाच्या बाबतीत प्रगत आहेत. म्हणून त्याची कारणे काय आहेत हे शोधण्यासाठी पुढील विषयाची निवड करण्यात आलेली आहे.

“मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्रातील ‘ब’ दर्जाच्या नगरपालीकांचे तौलनिक अध्ययन : विशेष संदर्भ - बीड व अहमदनगर जिल्हा”

संशोधनाचे महत्व :

सत्तेचे विक्रेंदीकरण करणारे प्रभावी साधन म्हणून स्थानिक संस्थेकडे पाहीले जाते. परंतू मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्रातील नगरपालीका यांच्यामध्ये विकासाचा प्रादेशिक असमतोल असल्याचे दिसून येते हा प्रादेशिक असमतोल कशामुळे आहे हे जाणून घेणे महत्वाचे ठरते म्हणून तुलनात्मक अभ्यासाच्या दृष्ठीने हे संशोधन महत्वाचे ठरते.

संशोधनाची उद्दिष्ठे :

□ाणत्याही संशोधनाचे उद्दीष्ठे काय आहेत यावर ते संशोधन ठरत असते त्यानुसार या संशोधनाची उद्दीष्ठे खालील प्रमाणे आहेत.

१. स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निर्मितीचा उद्देश तपासणे
२. मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्रातील नगरपालीकांची सद्य स्थिती तपासणे
३. मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्रातील नगरपालीकांचा विकासाचा प्रादेशिक असमतोल अभ्यासणे
४. मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्रातील नगरपालीकांचा विकासाचा प्रादेशिक असमतोल असण्याची □ार□ शोध□.

□ृहितके :

उपरोक्त विषयावरील प्रारंभीक अध्ययन व उद्दीष्ठांना अनूसरून गृहितकाची मांडणी करण्यात येत आहे.

१. स्थानिक स्वराज्य संस्थाच्या विकासाचा प्रादेशिक असमतोल आहे.
२. मराठवाड्यातील नगरपालीका विकासाच्या तुलनेने मागसलेल्या आहेत.

३. पश्चिम महाराष्ट्रातील नगरपालीका विकासोन्मुख आहेत.

४. नगरपालीकांचा इतिहास, स्थानिक नेतृत्व, राजकीय पार्श्वभूमी, तेथील परिस्थीती, इत्यादीचा परिणाम नगरपालीकेच्या विकासावर होतो.

सेशोधन पध्दती :

सदरील संशोधनासाठी वर्णनात्मक व विश्लेषणत्मक पध्दतीचा अवलंब करायचा आहे.

१. संशोध-न शिर्ष□ :

मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्रातील ‘ब’ दर्जाच्या नगरपालीकांचे तौलनिक अध्ययन : विशेष संदर्भ - बीड व अहमदनगर जिलहा

२. संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :

संशोधनाचे भौगोलिक क्षेत्र हे बीड व अहमदनगर जिल्ह्यापुरते मर्यादीत राहील. कालमर्यादा ही इ.स. २००० पासून आजतागायत राहील.

३. संशोध-न स्वरूप :

संशोधनाचे स्वरूप हे सामाजिक शास्त्र पध्दतीचे राहील. या संशोधनात ग्रथालयीन व क्षेत्रीय पध्दत या दोन्हींचा वापर करण्यात येईल. त्या अनूशंगाने प्राथमिक व द्वितीय स्त्रोतांचा वापर करण्यात येईल.

माहीती संकलन :

संशोधनाची माहिती संकलन करण्यासाठी खालील स्त्रोतांचा वापर करण्यात येईल.

अ. प्राथमिक स्त्रोत :

प्राथमिक स्त्रोताच्या माध्यमातून तथ्य संकलन करित असतांना प्रश्नावली, मुलाखती व अनुसुची या माध्यमातून संकलीत केलेल्या माहितीचे विश्लेषण केले जाईल.

ब. द्वितीय स्त्रोत :

१. संदर्भ ग्रंथ
२. नियत कालिके
३. वार्षिक अंदाजपत्रके

नमुना निवड :

प्राथमिक स्त्रोतातील नमुन्याच्या मुलाखती व प्रश्नावली साठी वेगवेगळ्या नमुना तंत्राचा वापर केला जाईल.

यादृच्छिक नमुनानिवडी प्रमाणे एकून 'ब' दर्जाच्या नगरपालीकापैकी काही ठराविक नगरपालिकांची निवड केली जाईल. या सर्व मार्गाने माहितीचे वर्णन करून विश्लेषणाच्या आधारे निष्कर्ष काढण्यात येतील.

प्रकरणाची आखणी :

या संशोधन विषयाची अभ्यास प्रकरणे योजना साधारणपणे खालील प्रमा□ राहील. सदरिल प्र□र□ संशोधन करताना क्रमवारीच्या दृष्टिने बदलू शकतात व त्यात थोडे फार अनुशंगीक बदल ही होऊ शकतात. किंवा संबंधीत प्रकरणे आराखड्याप्रमाणे ही राहु शकतात.

१. मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्र विभागाची ऐतिहासीक व भौगलिक पार्श्वभूमी.
२. स्थानिक स्वराज्य संस्था उदय, विकास, स्वरूप व महत्व.
३. मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्रातील ‘ब’ दर्जाच्या नगरपालिका व त्यांचे तेथील विकासात योगदान.
४. मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्रातील निवडलेल्या ‘ब’ दर्जाच्या नगरपालिकांचे तुलनात्मक अध्ययन.
५. ि-ष□र्ष व शिफारशी

संदर्भ □ंथ :

१. स्थानिक स्वराज्य संस्था - डॉ. वा.भा. पाटील
२. भारतातील स्थानिक स्वराज्य संस्था - डॉ. रमेश एखेळीकर
३. भारतातील स्थानिक स्वशासन - डॉ. सतिश ठोंबरे
४. भारतातील स्थानिक स्वशासन - प्रा. अ. ना. कुलकर्णी
५. इंडियन लोकल गव्हर्नमेंट ए स्टडी, कलकत्ता - भार्गवा बी. एस. एस. रामाराव
६. लिडरशिप इन पंचायती राज - डॉ. अर्जून वाय. दर्शनकार
७. मराठवाड्यातील महानगरपालिका व नगरपालिका - पवार दे. भी.
८. पंचायत राज व नागरी प्रशासन - डॉ. अर्जूनराव दर्शनकार

९. पब्लिक ॲडमिनिस्ट्रेशन - माहेश्वरी एस. आर. आणि डॉ. अवस्थी

१०. स्थानिक स्वराज्य संस्था - यलमवाड गोविंद

११. □ास्ट इन मॉडर्न इंडीया - श्रीनिवास एम. एन.

१२. भारतातील स्थानिक स्वराज्य संस्था - दाते सुनिल, एखेळीकर रमेश

१३. म्युन्सिपल लिडरशिप इन बीड डिस्ट्रीक्ट - दर्शनकार ए.वाय.

१४. असा महाराष्ट्र - □. सा□र

१५. □र्मचारी वर्ग प्रशासन आणि वित्तीय प्रशासन - प्रा. के. आर. बंग

संशोध□ | **मा□दर्श□**

प्रशांत भाऊसाहेब सोळंके | **प्रा. डॉ. विशाल रावसाहेब पतंगे**